
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 12 | JANUARY– 2025

# कोठारी आयोग आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०

**डॉ. रेणुकादास उबाळे**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,**
**एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर, जि. भंडारा.**

## प्रस्तावना :




स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शिक्षण क्षेत्रात कोठारी आयोग हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, प्रसार व सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने हा आयोग व त्याच्या शिफारसी महत्त्वाच्या आहेत. पुढील काळात या आयोगाच्या तत्त्वांना अनेक दृष्टिकोनातून छेद दिला गेला. त्यामुळे शिक्षण क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम पडला. आज नव्याने आलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि कोठारी आयोगाच्या शिफारसी यामध्ये मोठी विसंगती आहे. म्हणूनच कोठारी आयोगाच्या व्यापक धोरणाशी सुसंगत राहण्यासाठी नव्या शिक्षण धोरणामध्ये बदल करणे सुद्धा अत्यावश्यक बनले आहे.

## भारतीय शिक्षण आयोग (कोठारी आयोग) :

माध्यमिक शिक्षण आयोग तसेच त्यापूर्वीच्या शिक्षण आयोगातील शिफारसी पूर्णत्वाने लागू न झाल्यामुळे भारत सरकारने १४ जुलै १९६४ रोजी डॉ. दौलतसिंह एच. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली एक शिक्षण आयोग स्थापन केला. या आयोगालाच 'भारतीय शिक्षण आयोग' (Indian Education Commission) किंवा 'कोठारी आयोग' असे म्हणतात या आयोगाचे चिटणीस जे. पी. नाईक होते. तसेच या आयोगावर राष्ट्रीय पातळीवरीलच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरील फ्रान्स, जपान, ब्रिटन, अमेरिका व रशिया या देशातील शिक्षणतज्ञ सभासद म्हणून होते. पूर्वीच्या आयोगांनी शिक्षणाच्या एका विशिष्ट स्तराचाच विचार केला होता. कोठारी आयोगाने मात्र शिक्षणाच्या सर्व स्तरांचा आणि अंगांचा विचार केला. शैक्षणिक आणि राष्ट्रीय पुनर्रचना एकमेकांशी संबंधित आहे. एकमेकांवर अवलंबून आहेत त्यामुळेच या आयोगाच्या नावात 'एज्युकेशन कमिशन' यांबरोबर 'एज्युकेशनल' आणि 'नॅशनल डेव्हलपमेंट' असे शब्द आहेत."[१] भारतीय शिक्षणाला पहिल्यांदाच या आयोगाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर एवढे महत्त्व मिळाले. शिवाय शिक्षणाचा समग्रलक्षी विचार करण्यात आला. म्हणूनच भारतीय शिक्षणाच्या इतिहासात कोठारी आयोग आत्यंतिक महत्त्वाचा मानला जातो.

कोठारी आयोगाच्या पहिल्या खंडातील 'शिक्षा और राष्ट्रीय लक्ष्य' या पहिल्या अध्यायात 'शैक्षिक क्रांती' या शीर्षकाखाली नमूद केले आहे की, "शिक्षा की योजना सामाजिक न्याय को बढ़ावा देने या उसमें कमी करणे की दृष्टि से की जा

सकती है। इतिहास में ऐसे अनेक उदाहरण भरे पड़े हैं जबकि, छोटे-छोटे सामाजिक समूहों तथा श्रेष्ठ लोगों ने शिक्षा का उपयोग शासन करने के अपने परमाधिकार तथा अपनी श्रेष्ठता बनाए रखने के एक साधन के रूप में तथा उस मूल्य को स्थायी बनाने के लिए किया है जिसपर कि वे आश्रित थे। इसके विपरीत, शिक्षा के कारण उस संगठन में सामाजिक और सांस्कृतिक क्रांति हुई है जिसमें शिक्षा के अवसरों की समानता है तथा शिक्षा का प्रयोग अधिकाधिक संभव प्रतिभाओं का विकास करने तथा राष्ट्रीय समस्याओं के समाधान के लिए प्रयत्नपूर्वक किया गया है।"[२] वरील संदर्भावरून कोठारी आयोगाला भारतातील शिक्षणाचे सामाजिक-सांस्कृतिक राजकारण काय होते, याची जाणीव असल्याचे लक्षात येते. यावर उपाय म्हणून भारतात शैक्षणिक क्रांती घडविण्याच्या दृष्टीने आयोगाने प्रामुख्याने अंतर्गत परिवर्तन, गुणात्मक बदल आणि शैक्षणिक सुविधांचा विस्तार या तीन गोष्टींवर भर दिला.

कोठारी आयोगाने अनेक महत्त्वाच्या शिफारसी केल्या. शाळेपासूनच शास्त्रांचे शिक्षण द्यावे, कार्यानुभवातून उत्पादक कामांची संधी मिळावी, माध्यमिक स्तरापासूनच व्यावसायिक शिक्षण मिळावे, लोक वस्त्यांमध्ये सामाईक शाळांची उभारणी करावी, प्राथमिक शाळा एक किलोमीटरच्या परिसरात असावी. ज्यांना शाळा-महाविद्यालयात जाणे अशक्य आहे. अशांसाठी अंशकालीन किंवा घरी बसून शिक्षण घेण्याचे मार्ग उपलब्ध करून द्यावे, रात्र महाविद्यालये सुरू करावीत, प्राथमिक शाळेत 'पुस्तके व साहित्य मोफत पुस्तकपेढी योजना' सुरू करावी, यांसारख्या अनेक शिफारशी केल्या. याशिवाय पूर्व प्राथमिक शिक्षण एक ते तीन वर्षांचे असावे, प्रथम दहा वर्षांमधील शिक्षण निम्न प्राथमिक शिक्षण ४ वर्षे, उच्च प्राथमिक शिक्षण ३ वर्षे व निम्न माध्यमिक शिक्षण ४ वर्षे असे विभागलेले असावे असेही रचनात्मक बदल सुचविले. विशेष म्हणजे '१० + २ + ३' ही शैक्षणिक संरचना कोठारी आयोगाच्या शिफारसीनुसार केलेली आहे. थोडक्यात, शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल घडविणा-या अनेक शिफारशी कोठारी आयोगाने केल्या आहेत.

कोठारी आयोगाने त्रि-भाषा सूत्राचा पुरस्कार केला. म्हणजे विद्यार्थ्यांची मातृभाषा, राष्ट्रभाषा म्हणून हिंदी आणि इंग्रजी या भाषांचा अभ्यासक्रमात स्वीकार केला. पदवी पातळीपर्यंत मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असावे. परंतु इंग्रजी ही संपर्क भाषा म्हणून शिकवावी, अशी तरतूद केली. आयोगात नमूद केले आहे की, "अवर प्राथमिक स्तर पर छात्र की इच्छा के अनुसार केवल एक ही भाषा - मातृभाषा या प्रादेशिक भाषा - अनिवार्य रूप से पढ़ाई जानी चाहिए। अधिकांश छात्रों के मामले में इस अवस्था पर प्रादेशिक भाषा पढ़ेंगे जो उनकी मातृभाषा भी होंगी। कुछ भाषायी अल्पसंख्य बच्चे भी प्रादेशिक भाषा पढ़ना चाहेंगे क्योंकि इसमें उन्हें बहुत फायदा फायदे होंगे। लेकिन यह उन पर लादी नहीं जा सकती, उन्हें संविधान के अन्तर्गत यह अधिकार मिला है कि अपनी मातृ-भाषा के माध्यम से प्राथमिक शिक्षा पा सकें।"[३] यावरून असे दिसते की विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेत शिक्षण देण्याच्या बाबतीत या आयोगाने बांधिलकी मानली होती.

अभ्यासक्रमासंबंधी या आयोगाच्या ८.०७ मधील 'उच्च पाठ्यचर्या को क्रमिक रूप से लागू करना' या शीर्षकाखाली म्हटले आहे की, "इसमें भी महत्वपूर्ण बात यह है कि राज्य स्कूल शिक्षा बोर्ड उच्च पाठ्यचर्याएं बनाकर श्रमिक कार्यक्रम के रूप में अनेक वर्षों में उन्हें भी सभी स्कूल और विषयों में लागू करें। इस प्रयोजन के लिए बोर्ड को उच्च और साधारण दो पाठ्यचर्याएं बनानी चाहिए। सामान्य पाठ्यचर्या सभी स्कूलों के लिए समान होनी चाहिए। उच्च पाठ्यचर्या ऐसी होनी चाहिए जिसे इस समय केवल अच्छे स्कूल ही अपना सके; लेकिन वह अब कुछ समय बाद - लगभग साल बाद - संभवतः साधारण पाठ्यचर्या बन जाएगी।"[४] नवा अभ्यासक्रम राबविताना तो क्रमाक्रमाने राबविला तरी कालांतराने तो समान करण्यावर आयोगाचा भर होता, असे दिसते. "शिक्षणातून सामाजिक आणि नैतिक मूल्ये विकसित होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि अभ्यासेतर

कार्यक्रम यांची रचना हवी. शिक्षणातील गुणात्मक बदलासाठी आयोगाने शैक्षणिक सुविधांचा कमाल वापर, शैक्षणिक आकृतिबंधाची पुनर्मांडणी (१० + २ + ३), शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा, अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके आणि मूल्यमापन यांत आमूलाग्र सुधारणा आणि सर्वच स्तरांवर निवडक शैक्षणिक संस्थांमध्ये आमूलाग्र सुधारणा (असे केल्याने या संस्था आदर्श म्हणून राहतील) इत्यादी मार्ग सुचविले आहेत."[५] अशा अनेक बदलांच्या शिफारसी केल्याने कोठारी आयोग अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा ठरला. समाजाच्या गरजेनुसार पाठ्यक्रम तयार करण्याच्या सूचना आयोगाने दिल्या होत्या. थोडक्यात, भारतीय शिक्षणाच्या इतिहासात कोठारी आयोग महत्त्वाचा ठरतो.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ :

३० मे २०१९ रोजी के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांच्या समितीने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०१९ चा मसुदा भारत सरकारकडे सादर केला. हा मूळ मसुदा सुरुवातीला हिंदीत(६५० पानी) व इंग्रजी (४८४ पानी) या दोनच भाषेत १ जून २०१९ रोजी हा मसुदा जाहीर करण्यात आला. त्यानंतर २० भारतीय भाषांमधून या मसुद्याचा संक्षिप्त व त्रोटक सारांश सादर करण्यात आला. २९ जुलै २०२० रोजी मंत्रिमंडळाकडून या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता देण्यात आली.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मूळ हिंदीतील मसुदा 'स्कूली शिक्षा', 'उच्च शिक्षा', 'अतिरिक्त प्रमुख फोकस क्षेत्र', 'शिक्षा में बदलाव' आणि 'परिशिष्ट क्रियान्वयन' अशा पाच प्रमुख भागांमध्ये विभागलेला आहे. यातील प्रस्तावनेत 'भारत के विरासत की देन' या भागात इतिहासातील भारतीय शिक्षण व्यवस्था, शास्त्र आणि कलांचे उदात्तीकरण करून कस्तुरीरंगन म्हणतात की, "विश्व धरोहरो के लिए इन समृद्ध विरासतों को न केवल भावी पीढ़ी के लिए पोषित और संरक्षित किया जाना चाहिए बल्कि हमारी शिक्षा प्रणाली के जरिए बढ़ाना चाहिए और इसे नए उपयोग में भी लाना चाहिए।"[६] या विधानातून समितीचा भारतीय शिक्षणाच्या इतिहासाचे आणि परंपरेविषयीचे प्रेम व्यक्त होते.

या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने विद्यार्थ्यांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची दखल घेत याबाबत प्रावधान केले आहे. "वर्तमान नीति की शुरुआत ई. सी. सी. ई. (Early Childhood Care and Education) को स्कूली शिक्षा के बुनियादी स्तर (पूर्व प्राथमिक शिक्षा के ३ साल एवं ग्रेड १ व २) के रूप में देखते हुए होती है, जिसमें ३-   वर्ष की आयु के बीच के बहुत छोटे बच्चों के लिए खेलने व खोज आधारित सीखने के लिए एक ही पाठ्यचर्या और शैक्षणिक चरण हों।"[७] यानंतर ग्रेड ३, ४ व   असे तीन वर्षांचे शिक्षणाचे प्रारंभिक चरण, यानंतर मध्य विद्यालय शिक्षणाचे म्हणजेच ग्रेड ६, ७ व   हे चरण व त्यानंतर माध्यमिक शिक्षणाचे चरण ज्यामध्ये ग्रेड ९, १०, ११ व १२ यांचा समावेश असेल, अशी रचना नव्या धोरणाने केली. थोडक्यात पूर्वीचा १० + २ + ३ असा क्रम बदलून तो पूर्वप्राथमिक शिक्षणासोबत ५ + ३ + ३ + ४ असा नवा आकृतीबंध या धोरणातून स्वीकारण्यात आला आहे. यालाच

- वर्षों की बुनियादी अवस्था (Foundational Stage) ३ वर्षों की प्री-प्राइमरी स्कूल के और ग्रेड १, २
- ३ वर्षों की प्राथमिक अवस्था (Preparatory) ग्रेड ३, ४, ५
- ३ वर्षों की माध्यमिक अवस्था (Middle or Upper Primery) ग्रेड ६, ७, ८
- ४ वर्षों की उच्च अवस्था (High or Secondary) ग्रेड ९, १०, ११, १२

असे विभाजित करण्यात आले आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाचा विचार करताना या शिक्षणावर काही स्वयंसेवक नियंत्रण ठेवतील असे सुचविले आहे. मात्र त्यांच्या पात्रतेसंबंधी कोणतेच निकष सांगितलेले नाहीत. विद्यमान सरकारची

सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि हिंदू राष्ट्राची विचारप्रणाली पाहता पूर्व प्राथमिक शिक्षणातूनच विद्यार्थ्यांवर विशिष्ट धार्मिक संस्कार करण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धर्मनिरपेक्षता या महत्त्वाच्या शैक्षणिक मूल्याला खीळ बसेल अशी शक्यता सुद्धा यातून निर्माण होते. तसेच कौशल्य शिक्षणाच्या नावाखाली बालवयातच विद्यार्थ्यांना परंपरागत व्यवसायाकडे ढकलण्याची शक्यता सुद्धा निर्माण होते.

या राष्ट्रीय शिक्षण धोरणात देखील शालेय अभ्यासक्रमातून वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, तार्किकता वाढविण्यासाठी धोरण प्रतिबद्ध असेल असे सांगितले आहे. मसुद्यातील 'स्कूलों में शिक्षाक्रम और शिक्षणशास्त्र' या भागात अभ्यासक्रमाचा उद्देश जाहीर करताना म्हटले आहे की, "२०२२ तक शिक्षाक्रम और शिक्षणशास्त्र में आमूल-चूल बदलाव करना ताकि रटने के प्रचलन को खत्म किया जा सके और इसकी जगह २१ वीं शताब्दी में आवश्यक ज्ञान, मूल्य, रुझान, हुनर और कौशल जैसे तार्किक-चिंतन, सृजनात्मकता वैज्ञानिक सोच, संवाद और सहयोग की क्षमता, बहुभाषिकता, समस्या समाधान, नैतिक चिंतन और कर्म, सामाजिक जिम्मेदारी व सरोकार और डिजिटल साक्षरता आदि के समग्र विकास को बढ़ावा दिया जा सके।"[८] या धोरणात उल्लेखिलेला उद्देश हा कमी-अधिक फरकाने जुन्या धोरणातील बाबींचा केलेला पुनरुच्चार आहे. अभ्यासक्रमाच्या प्रत्यक्ष उपयोजनाबाबत मसुद्यात "शिक्षाक्रम मैं बुनियादी साक्षरता और संख्याज्ञान पर अतिरिक्त ध्यान दिया जाएगा - और प्राथमिक स्तर पर आमतौर पर पढ़ने, लिखने, बोलने, गिरने और गणितीय सोच पर ध्यान केंद्रित करना महत्वपूर्ण होगा।"[९] असे नमूद करण्यात आले आहे. यावरून कामचलाऊ शिक्षणाकडे प्रवास सुरु होण्याची शक्यता बळावेल असे लक्ष्यात येते.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात शालेय अभ्यासक्रमासंदर्भात म्हटले आहे की, "अधिक समग्र, अनुभव-आधारित, विमर्श आधारित, विश्लेषण-आधारित सीखना हो इसके लिए हमें शिक्षाक्रम के हर विषय की विषय-वस्तु को घटाना होगा और कुछ मूलभूत केंद्रीय विषय-वस्तु पर केंद्रित करना होगा।"[१०] म्हणजे स्थानिक आशय असलेली राष्ट्रीय क्रमिक पुस्तके अभ्यासक्रमात असावीत, यावर भर देण्यात आला आहे, असे दिसते. अभ्यासक्रमाचे हे केंद्रीयीकरण भारतातील विषम सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या राज्यांमध्ये कितपत सोयीचे होईल, याबाबत शंका वाटते. शिवाय यातून विशिष्ट राजकीय व विचारधारात्मक दृष्टिकोण सामान्यांवर थोपविण्याचे कार्य सुरू सुद्धा होऊ शकते. सध्या सत्तेत असलेल्या सरकारचा विशिष्ट धर्मकेंद्री विचार, धर्मनिरपेक्षतेवरील निष्ठेचा अभाव यामुळे ही शक्यता अधिक गडद बनते. त्यामुळेच "एनईपी हे संघ परिवाराच्या भारतीय समाजावरील आणि संस्कृतीवरील परिप्रेक्षाला खंबीरपणे पाठिंबा देते. उदाहरणार्थ, चिकित्सक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संविधानिक / भारतीय घटनेच्या मूल्यांना आम्ही प्रोत्साहन देऊ असं जरी एनईपीची संहिता म्हणत असली तरी त्यामध्ये 'धर्मनिरपेक्षता' (Secularism) हा शब्द एकवेळादेखील येत नाही."[११] असं निरीक्षण कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया (मार्क्सवादी) ने नोंदवले आहे. शिवाय अभ्यासक्रम व अभ्यासक्रमेतर असे वर्गीकरण न करता काही कलांसोबतच "मिट्टी के बर्तन बनाना, लकड़ी का काम, बागवानी....."[१२] आदी व्यावसायिक कामांचाही समावेश अभ्यासक्रमात करण्याची तरतूद केली आहे. एका अर्थाने परंपरागत व जातिगत कामांना मान्यता देऊन त्यातून जातिव्यवस्थेचे बळकटीकरण होईल, असा धोका संभवतो.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात मातृभाषेला महत्त्व दिल्याचे वरकरणी दिसत असले तरी त्रिभाषा सूत्राचाच अवलंब केल्याचे दिसून येते. मसुद्यात नमूद केले आहे की, "जहाँ तक भी संभव हो - कम से कम ग्रेड    तक लेकिन वांछनीय तो यह है कि यह ग्रेड    तक हो - सीखने - सिखाने की प्रक्रिया में होने वाले संवाद का माध्यम मातृभाषा / घर की भाषा / स्थानीय भाषा में होंगे।

इसके बाद, घर की भाषा / मातृभाषा को लगातार एक भाषा के रूप में जहाँ तक संभव हो सिखाना चाहिए।"[१३] वरील विधानात 'जहाँ तक संभव हो' हा शब्दप्रयोग दोन वेळा करून मातृभाषेच्या स्वीकारातील संदिग्धता स्पष्टपणे अधोरेखित केली आहे. शिक्षणाचे माध्यम म्हणून संदिग्धता कायम ठेवत "संस्कृत का अध्ययन और इसके विशाल साहित्य का ज्ञान"[१४] या भागात संस्कृत भाषेचे उदात्तीकरण करण्यात आले आहे. तसेच "संस्कृत के अलावा भारत की अन्य शास्त्रीय भाषाओं पाली, फारसी, प्राकृत, तमिल, तेलुगू, कन्नड़, मलयाली और ओड़िया आदि के समृद्ध साहित्य के शिक्षण को स्कूलों में व्यापक रूप से उपलब्ध करवाया जाएगा।"[१५] असे म्हणताना 'उर्दू' या महत्त्वपूर्ण भाषेचा अनुल्लेख केल्याचे दिसते. थोडक्यात, मातृभाषेचा माध्यम म्हणून स्वीकारण्याचा दिखावा, त्रिभाषा सूत्राचा स्वीकार, संस्कृतचे अवाजवी महत्त्व व उर्दूसारख्या समृद्ध भाषांचा अनुल्लेख अशी भाषाविषयक वैशिष्ट्ये मसूद्यातून व्यक्त होतात.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मसुद्यात "२०१६-१७ में १,१९,३०३ स्कूल एकल शिक्षक विद्यालय थे। इनमें से अधिकांश (९४,०२८) कक्षा १ से  वाले प्राथमिक स्कूल थे।"[१६] हे विदारक वास्तव नमूद करण्यात आले. परंतु यावरील उपाय म्हणून शिक्षकभरतीचा मार्ग न स्वीकारता 'स्कूल कॉम्प्लेक्स' नावाची नवीन संकल्पना मांडण्यात आली आहे. ज्यामध्ये लहान शाळा संपुष्टात आणून 'बुनियादी स्तर (३ से  वर्ष की उम्र) से लेकर कक्षा १२ (१८ वर्ष) साठी एकत्रित शिक्षण देण्यात येईल असे सांगितले आहे. शाळा संकुलाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या निवासापासून शाळा जवळ असण्याच्या त्यांच्या मूलभूत अधिकारापासून त्यांना वंचित ठेवणारी आहे. ही संकल्पना म्हणजे सरकारने मूळ प्रश्नांना बगल देत, आपल्या संसाधनांची बचत करीत, त्यावरील खर्च टाळून शोधलेली सोपी पळवाट आहे, असे दिसते.

अलीकडच्या काळात शिक्षणाच्या खाजगीकरणाचा व बाजारीकरणाचा वेग झपाट्याने वाढलेला आहे. शिक्षण ही बाजारातील क्रयवस्तू बनून दिवसेंदिवस शिक्षणावरील खर्च सामान्यांना न झेपावण्यातइतका वाढताना दिसत आहे. अशा अवस्थेत शिक्षणाचे सरकारीकरण होऊन ते राज्यवित्तपोषित, दर्जेदार, समान व मोफत होणे अत्यावश्यक आहे. अशा अवस्थेत राष्ट्रीय शिक्षण धोरणातून शिक्षणाच्या खाजगीकरणाला आळा घालून शासकीय शिक्षण सार्वजनिक व सक्षम करण्याऐवजी शिक्षणाच्या खाजगीकरणाला समर्थन दिल्याचे स्पष्टपणे जाणवते. "निजी परोपकारी स्कूलों ने भारत में एक महत्वपूर्ण भूमिका निभायी हैं और भविष्य में भी निभाते रहेंगे। इन पहलो को संदेह के साथ हतोत्साहित करने की बजाय प्रोत्साहित किया जाना चाहिए। ऐसे स्कूलों को भी नियामक अधिकार और इसके परिणाम स्वरूप उत्पन्न होने वाली समस्याओं से मुक्त कर सशक्त किया जाना चाहिए।"[१७] अशा शब्दांत खाजगी शाळा आणि त्यांच्या उत्पन्नाचे मुक्तपणे समर्थन या मसुद्यात केल्याचे दिसून येते.

थोडक्यात, राष्ट्रीय शिक्षण धोरण हे शिक्षणाच्या खाजगीकरणाचे समर्थन करणारे, स्कूल कॉम्प्लेक्सच्या माध्यमातून सामान्य विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कावर गदा आणणारे, धर्मनिरपेक्षता या मूल्याकडे दुर्लक्ष करणारे, भांडवलशाही समर्थक शिक्षण धोरण आहे, असे जाणवते.

## संदर्भ :

१. http://vishwakosh.marathi.gov.in/25134 (Reference dated 13 November 2021).

२. *'शिक्षा आयोग की रिपोर्ट (१९६४-६६)'* – शिक्षा और राष्ट्रीय विकास शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, प्रथम संस्करण (हिन्दी) १९६८, पृ. क्र. ५-६.

३. शिक्षा आयोग की रिपोर्ट – तत्रैव, पृ. क्र. २१४.

४. शिक्षा आयोग की रिपोर्ट – तत्रैव, पृ. क्र. २०५.

५. http://vishwakosh.marathi.gov.in/25134 (Reference dated 13 November 2021).

६. कस्तूरीरंगन के. – प्रारूप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'*, भारत सरकार, पृ. क्र. ३४.

७. कस्तूरीरंगन के. – तत्रैव, पृ. क्र. ३७.

८. प्रारूप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'*, भारत सरकार, हिंदी संस्करण, पृ. क्र.९६.

९. प्रारूप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'*, – तत्रैव, पृ. क्र. ७५.

१०. प्रारूप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'*, – तत्रैव, पृ. क्र. १०३.

११. वलसे राजक्रांती, तेगमपुरे मारोती (अनुवादक), *'नवीन शैक्षणिक धोरण २०२०'*, *'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया (मार्क्सवादी) चा प्रतिसाद'*, *'अक्षरगाथा'*- संपादक - जाधव मा. मा., वर्षे : बारावे, अंक : दुसरा, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१, पृ. क्र. ८०.

१२. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. १०४.

१३. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. १०७

१४. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. ११७.

१५. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. ११८.

१६. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. २१८.

१७. प्रारुप, *'राष्ट्रीय शिक्षा नीति २०१९'* – उनि. पृ. क्र. २६२.